पल्लवांकुर



# S - 9 चा वापर

कंपोस्ट खत आपण मोकळ्या किंवा कोणत्याही समतल जमिनीवर तयार करू शकता. ही जागा उन्हात किंवा सावलीत, कुठेही असली तरी चालेल. हौद किंवा पिंजरादेखील यासाठी वापरता येईल.

S - 9 चा उपयोग करुन कोणत्याही प्रकारचा कचरा खतात रूपांतरित करता येतो. यासाठी ओला व सुका कोणताही कचरा चालतो. फक्त त्यात प्लास्टिक किंवा काच नसेल याची खात्री करावी.

सर्वप्रथम ६ इंच ते १ फूट जाडीचा कचऱ्याचा थर द्यावा. ५०० ग्राम S - 9 कल्चर २०/२५ लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. हे द्रावण घड्याळाच्या दिशेने चांगले ढवळावे. त्यावर S - 9 चे द्रावण शिंपडावे. असे एकावर एक ४ थर देता येतील. कचरा कमी असल्यास २ थर दिले तरी चालतील. संपूर्ण ढीग शेण व मातीने लिंपावा. दर १५ दिवसांनी कचरा खाली वर केल्यास खात लवकर तयार होईल. अंदाजे ३ महिन्यात चांगल्या प्रकारचे कंपोस्ट खत तयार होते.